# १. इतिहासाची साधने

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा**.

**(१) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार .......येथे आहे.**
(अ) पुणे
**(ब) नवी दिल्ली**
(क) कोलकता
(ड) हैदराबाद

**(२) दृक्-श्राव्य साधनांमध्ये ....... या साधनाचा समावेश होतो.**
(अ) वृत्तपत्र
**(ब) दूरदर्शन**
(क) आकाशवाणी
(ड) नियतकालिके

**(३) भौतिक साधनांमध्ये ....... चा समावेश होत नाही.**
(अ) नाणी
(ब) अलंकार
(क) इमारती
**(ड) म्हणी**

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा व लिहा.**

| **व्यक्ती** | **विशेष** |
|---|---|
| जाल कूपर | टपाल तिकिट अभ्यासक |
| कुसुमाग्रज | कवी |
| अण्णाभाऊ साठे | लोकशाहीर |
| अमर शेख | चित्रसंग्राहक |

**उत्तर :**

**चुकीची जोडी:** अमरशेख - चित्रसंग्राहक.
**दुरुस्त केलेली योग्य जोडी:** अमरशेख - शाहीर.

**२. टीपा लिहा.**

**(१) लिखित साधने**

**उत्तर:** (१) 'लिखित साधने' हे इतिहासलेखनाचे अत्यंत विश्वसनीय असे साधन आहे.

(२) लिखित साधनात वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, सरकारी गॅझेट, कोशवाङ्मय अशा छापील साहित्याचा समावेश होतो.

(३) रोजनिशी, पत्रव्यवहार, अभिलेखागारातील कागदपत्रे इत्यादी हाती लेखन केलेले साहित्यही लिखित साधनातच मोडते.

(४) या साधनांतून समाजजीवनातील घडामोडी, चळवळी,सांस्कृतिक जीवन, प्रशासकीय धोरणे, सामाजिक प्रथा, समाजाची प्रगती इत्यादी सर्वांगीण बाबींचा आपल्याला अभ्यास करता येतो.

**(२) प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (पीटीआय).**

**उत्तर:** (१) देशभरातील वृत्तपत्रांना जगभरातील बातम्या पुरवण्याचे काम पीटीआय, यूएनआय, समाचार भारती व हिंदुस्थान समाचार या संस्था करतात.

(२) जगभरातील महत्त्वाच्या घटनांचे प्राथमिक तपशील, महत्त्वाच्या विषयांवरील लेख प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाकडून मिळतात.

(३) पीटीआय ही वृत्तसंस्था १९५३ पासून वृत्तलेख, छायाचित्रे, आर्थिक, वैज्ञानिक विषयांवरील माहिती वृत्तपत्रांना देत आली आहे. १९९०च्या दशकात पीटीआयने टेलिप्रिंटर्सऐवजी उपग्रह प्रसारण तंत्राद्वारे बातम्या देशभर पाठवायला सुरुवात केली आहे.

(४) पीटीआय ही वृत्तसंस्था सरकारी असून या वृत्तसंस्थेने दिलेल्या बातम्या अधिकृत आणि विश्वसनीय मानल्या जातात. म्हणूनच हा मजकूर इतिहासलेखनासाठी महत्त्वाचा व उपयुक्त असतो.

**३. कारणे लिहा.**

**(१) टपाल खाते टपाल तिकिटांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा वारसा व एकात्मता यांच्या जतनाचे प्रयत्न करते.**

**उत्तर:** (१) भारत हा वैविध्याने नटलेला देश असून टपाल खात्याने हे वैविध्य आपल्या टपाल तिकिटांच्या माध्यमातून साकारलेले दिसून येते.

(२) भारत स्वतंत्र झाल्यापासून टपाल तिकिटे बदलत्या काळाविषयीची माहिती आपणांस सांगत आली आहेत.

(३) विविध नेत्यांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या, ऐतिहासिक घटनांचे रौप्य ते शतकोत्सव अशा प्रसंगांवर टपाल तिकिटे काढली गेली आहेत.

(४) प्राणी, पक्षी, फुले असा निसर्ग, देशातील विविध सण- महोत्सव, महत्त्वपूर्ण संस्थांच्या स्मृती इत्यादींविषयीची तिकिटे टपाल खात्याने काढलेली आहेत.
अशा रितीने टपाल खाते आपल्या तिकिटांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा, इतिहासाचा मौल्यवान वारसा आणि एकात्मता यांचे जतन करण्याचा प्रयत्न करते.

**(२) आधुनिक भारताचा इतिहास लिहिण्यासाठी दृक् श्राव्य माध्यमे महत्त्वाची असतात.**

**उत्तर:** (१) दूरदर्शन, चित्रपट, आंतरजाल (इंटरनेट), माहितीपट इत्यादींना 'दृक्-श्राव्य साधने असे म्हणतात. अशा साधनांमुळे चालू असणाऱ्या घटनांचे चित्रीकरण करता येते.

(२) राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, महोत्सव, ऐतिहासिक वास्तू या सर्वांचे चित्रीकरण झाल्याने त्या घटना आपल्याला पुन्हा पुन्हा पाहता व ऐकता येतात.

(३) वृत्तपट व अनुबोधपट यांमुळे इतिहास पुन्हा जिवंत होतो व तो इतिहासलेखनाला उपयुक्त ठरतो. म्हणून आधुनिक भारताचा इतिहास लिहिण्यासाठी दृक्-श्राव्य माध्यमे महत्त्वाची असतात.